तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?

# प्रभुतरुण

( स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३ )

www.prabhutarun.com

: संपादिका :

सुहासिनी कीर्तिकर

: कार्यकारी संपादकमंडळ :

मिनाक्षी जयकर

मयुरा नायक

संजना कोठारे

वैजयंती कीर्तिकर

किंमत १ रुपया



**प्रभु तरुण आश्रयदाते**

१) सौ. विमल व श्री. माधव नायक
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तीकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य

**प्रभु तरुण आश्रयदाते**

१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे, कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर, कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक



वर्ष ८६ वे) प्रभुतरुण मुंबई, बुधवार, ता. १६ माहे फेब्रुवारी, सन २०११ (अंक ९७९


*संपादकीय*

## अनोखा अनुभव

-सुहासिनी कीर्तिकर

आजवर आता सगळ्यांनाच जाहीर झालंय की अभिनेता आमीरखान जाणीवपूर्वक मराठी शिकतोय. अमराठी भाषकांना मराठी शिकविण्याचा जो उपक्रम साहित्य संघाने निष्ठेने चालवला आहे; त्या अंतर्गत या उपक्रमाची संचालिका या नात्याने मी श्री. सुहास लिमये यांना या विद्यार्थ्याला शिकविण्याचं काम सोपविलंय्... हे नव्यानं सांगण्याची गरजच नाही. पण परवाच्या ३० जानेवारीला आमीरखान खरोखरच 'विद्यार्थी' कसा आहे याचा अनुभव मला आला. झालं काय की; लिमये यांच्या एक खणी छोट्याशा जागेत यायची इच्छा आमीरनं व्यक्त केली. जेवायला हे 'मेहुण' येणार होतं. माझ्याशी गाठ पडावी अशी त्याची इच्छा असल्यानं या जेवणाचं मलाही आमंत्रण होतं. २५, २६, २७ मार्च रोजी साहित्य संघात होणाऱ्या साहित्योत्सवाचं त्याला रितसर निमंत्रण द्यायचं होतं. त्याला त्यावर चर्चा करायची होती, म्हणून ही गाठभेट. अनोखी अशी. बरोब्बर बाराच्या ठोक्याला आमीर अन् किरण राव लिमयांच्या मठीत आले. गिरगावच्या पिंपळवाडीत. कोणताही मेकअप न करता. कोणताही मोठेपणा न मिरवता. किरण तर इथं तिथं हिंडत अख्खं घर, -जसा महालच!- पाहत होती. मग गप्पा मारत आमची जेवणं झाली. आमची म्हणजे मी, श्री. लिमये अन् किरणची. आमीर म्हणाला, 'मी जेवलो तर डायाटेशियन डॉ. धुरंधर बोलतील मला.' 'अरे! डॉ. धुरंधर म्हणजे आपले डॉ. विनोद धुरंधर?' आमीरने पुष्टी जोडली, 'तेच ते.' मग त्याने शुभर ग्रॅमएवढी फळं खाल्ली. झाले की त्याचे जेवण!

पण दरम्यान आम्हाला जी गप्पांची मेजवानी मिळाली त्यानं आमच्या अंगावर मूठभर मांस चढलं! तो सध्या महाभारतावर एकूण सात चित्रपट काढण्याच्या विचारात आहे. मग महाभारताची मूळ प्रत असेल का? कुठे मिळेल? असे त्याचे प्रश्न. बनारसला संपूर्णानंद संस्कृत विद्यापीठ आहे. तिथे शोध घ्यावा लागेल असं माझं त्यावर उत्तर. तरीही आम्हा सगळ्यांनाच शंका की मूळ प्रत असेल का जतन केलेली? महाभारताच्या अनुषंगाने मग ज्ञानेश्वरी, गीताई, गीतारहस्य, व्यासपर्व, युगान्त अशा पुस्तकांवर त्याला आम्ही बरेच सांगितले. त्याला लोकमान्य टिळक माहीत होते; पण गीतारहस्य नाही. विनोबा भावे तो ऐकून होता; पण गीताई नाही. फार लक्षपूर्वक तो समजून घेत होता. बरचसं इंग्रजीतून आणि काही मराठीतून आमचं बोलणं चाललं होतं. नवीन शब्द सापडला की अर्थासकट तो त्याच्या तळहाताएवढ्या संगणकीय पाटीवर नोंदून घेत होता. उदा. 'नुस्ते' म्हणजे ओन्ली. केवळ, फक्त, मात्र हे त्याला पर्यायी शब्द वगैरे. बोलता बोलता त्यानं एक विधान केलं. जगभरातील महाकाव्यं एकदा लिहिली गेली अन् तिथेच संपली. म्हणजे होमरचंच लिखाण राहिलं पण रामायण, महाभारत ही भारतीय महाकाव्यं वाल्मिकी, व्यासांनी लिहिली अन् ती आजही लिहिली जात आहेत. विशेषत: महाभारत. मी म्हटलं, 'खरंय. त्याची वेगवेगळे अन्वय बदलत इंटराप्रिटेशन्स होतायत.' तर

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## She's Always a Woman to me

- Mayura Nayak

"In order to impact my world the way I wanted to impact it, I was going to have to become a woman of substance."

– Susan Meier (Author)

What defines a woman of substance? I think a woman of substance is someone who by sheer living makes a difference in this world. She is the one who attempts and fails, but does not mull over the failure! She is the one who can lead unconditionally! She is NOT a spectator but she is the EXECUTOR who is willing to stand by her decisions however wrong they may go! For her family and friends,

SHE is a part of the SOLUTION.

We often misunderstand a Woman of Substance to be the same as a Career

Woman. A woman need not be a career woman to become a 'woman of substance'. There are many women I know who are struggling to find their identity in the corporate world, while that does not stop them from being the women of substance, a working status does not qualify them to be one either.

A woman proves her metal at home by being the perfect homemaker, multitasking between the kitchen and the kids and others in the family! She is the one who moulds the children in the house, helps them grow and become better and successful human beings! For a homemaker her job is well done if she has successfully fulfilled her duties towards her family keeping her own identity intact. Duties she easily fulfills but she often forgets to prioritize her own needs and desires, losing her identity in the bargain. Being a homemaker is a 24/7 job, therefore it is very crucial for her to voice her personal priorities, do the things she likes which give her satisfaction. She has to have her own world which gives her enough space to move out of the mundane. I know of women who are homemakers and still take time out, this is their "ME" time! They run classes, or join hobby classes, do gardening, charity, explore places, meditate, cook, paint, decorate their house or even clean their house! But they certainly do not sit at home and pity their state and expect empathy in return. These women know to respect themselves and their time and therefore command respect from others as well. Many of us when asked to name one "woman of substance" we know, will name our own mothers! These mothers are the ones who have got IT right!

That makes them efficient, effective at the same time happy individuals! And after all, A happy homemaker makes a happy home!

Yes indeed homemakers are role models in their own way, but we cannot leave the 'corporate woman' out from this discussion. The status of women has been subject to many great changes over the past few millennia especially in India.

(पान २ कॉलम ३ वर)

पान१ कॉलम २ वरून

तो म्हणाला, 'नाही मॅडम, महाभारत इज स्टील बीईंग रिटन. केवळ अन्वायार्थ लावले जातात असं नव्हे.' हे मला नवीन होतं. खूप चर्चा, खूप उदाहरणं, खूप इतिहासलेखन याविषयी बोलणं झालं. मला त्याच्या बोलण्यात तथ्य वाटलं. समोर एखादा चांगला विद्यार्थी आहे अन् त्याच्याशी मी वाद घालतेय्, चर्चा करतेय् असा माहोल. लिमये गमतीनं सारं ऐकत होते. मग विषय वळला तो नगरव्यवस्थेच्या प्राचीनकाळच्या मांडणीकडे. म्हणाला, 'मी फत्तेपूरशिक्रीला गेलो होतो. मग लाल किल्ला, मग ताजमहाल. माझ्या गाईडला अकबराचे संडास नाही दाखविता आले. नव्हती का व्यवस्था?' इथे आम्ही काय 'गाईड' करणार? पण लिमये म्हणाले, रायगडावर तशी व्यवस्था होती म्हणजे निदान औरंगजेबाच्या काळात असणारच. मी भर घातली की पेशव्यांच्या काळी पुण्यात पाणी पोहोचण्याचे जमिनीखालून कालवे होते. तर ही व्यवस्था उत्तरेतूनच आली असणार दक्षिणेत. मग जरा वेळ ही चर्चा थांबवून त्याने २५ मार्चच्या साहित्य उत्सवाच्या उद्घाटनाचे स्वरूप जाणून घेतले. आमचे या उत्सवात अध्यक्ष आहेत के. ज. पुरोहित म्हणजे 'शांताराम' अन् उद्घाटक आहेत डॉ. बाळ फोंडके. या दोघांविषयी खोलात शिरून त्याने जाणून घेतले. 'त्यांच्याशी इंग्लीशमध्ये आधी संवाद साधला अन् नंतर 'माझ्या' मराठीत मी बोललो तर वुइल दे माईंड?'- असेही विचारले. मग त्यांचे फोननंबर्स मी दिले. (नंतर तसं या माणसांना मी कळवलंही. पुरोहितसर तर इंग्रजीचेच प्राध्यापक! ते फोनवर म्हणाले, 'सुहासिनी मजा येईल. काही काळजी करू नकोस.') किरण रावशी तिची मातृभाषा कोकणी आहे हे कळल्यावर पाच दहा मिनीटे मी कोकणीतून संवाद साधला. तेही आमीरनं बारकाईनं ऐकलं. म्हणाला, 'मी सांगतो तुम्ही दोघी काय बोललात ते!' गंमत म्हणजे त्याला काऽऽही कळलं नव्हतं. लिमये म्हणाले, 'आता कोकणीची ट्यूशन किरणकडून घे!' मजा आली. तिला तर खाली उतरून अवतीभोवती फिरून यायचं फार मनात होतं, पण बातमी गुपीत ठेवूनही आसपासच्या लोकांना कळलं होतं की आमीर अन् किरण राव इथं आलेत. दरवाजाबाहेर माणसांचा घोळका घोंघावत होता. त्यामुळे कसं शक्य होणार ते? मग असं ठरलं की केव्हातरी स्वत:च्या गाडीनं न येता टॅक्सीनं यायचं अन् लिमयांनी तिला गिरगाव दाखवायचा.

अखेरीस दीड दोन तासांची ती भेट संपण्याचा क्षण आला. काय करावं आमीरनं? लिमयांकडून कोरे कागद घेतले. त्यावर पन्नाससाठ सह्या ठोकल्या. म्हणाला, 'हे कागद कापून ह्या सह्या बाहेरच्या माणसांना नंतर द्या.' (मीही एक सहीचा कपटा लाटला!) निघता निघता फोटोची टूम निघाली. आमचे फोटो घेतले गेले. मला वाटलं लिमयांच्या कुटुंबासोबत फोटो आहे. आपण कशाला त्यात? तर त्यानं आग्रह करून मलाही त्याच्याशेजारी उभं करून खांद्यावर हात ठेवत त्या फोटोत सामावून घेतलं.

मग निघाले ते. त्यांचे आठ गार्डस् सोबत होते. ते, लिमये अन् एक शेजारी अशा दहाजणांनी अक्षरश: कडं करून त्यांनी बाहेर नेलं अन् निरोप दिला. घोळका चेकाळल्या-सारखा ओरडत होता, 'आऽऽमीर! आमीर!' त्यांच्या भेटीमुळं आमच्या मनात त्याचे पडसाद प्रामाणिकपणे उमटत होते. असं खरंच वाटत होतं की सिनेक्षेत्रात धडपडणारा हा प्रयोगशील अभिनेता, दिग्दर्शक जर तेथे पोहोचला नसता; तर एक संशोधक झाला असता! अशा संशोधक वृत्तीच्या माणसाशी माणूस म्हणून गाठ पडली अन् माणूस म्हणूनच माझ्या पदरात एव अनोखा अनुभव पडला.

---

पाठारे प्रभु चॅरिटीजचे 'न्यूज लेटर' जानेवारी २०११ सर्वत्र उपलब्ध झाले. ऐतिहासिक दस्तावेज म्हणून याला मूल्य आहे. अभिनंदन.

—**संपादक**

## पाठारे प्रभु चॅरिटीज
### वैद्यकीय चिकित्सा शिबीर

रविवार, दिनांक २७-२-२०११

वेळ: सकाळी ९.३० ते १.३०

स्थळ: सुरेश विठ्ठल हॉल, ठाकूरद्वार, मुंबई

अनेक मान्यवर धन्वंतरींची मोफत सेवा व सल्ला ज्ञातीयांसाठी उपलब्ध केली जाणार आहे. आपला रक्तगट कोणता आहे व रक्तात साखरेचे प्रमाण किती याची तपासणी करण्यासाठी खास व्यवस्था केली आहे. कार्डियोग्राम मोफत काढला जाईल.

कर्करोगाचे निदान करण्यासाठी खास तपासणी केली जाईल. गरजूंनी अवश्य लाभ घ्यावा.

पाठारे प्रभु चॅरिटीज
विश्वस्त मंडळाकरिता
अजित मो. विजयकर
अध्यक्ष-विश्वस्त
पाठारे प्रभु ज्ञाती भुवन नं. ३, १ला मजला, मुंबई-४००००२

---

पान१ कॉलम ४ वरून

In modern India, women have adorned high offices on the corporate as well as political front and have contributed to some of the most path-breaking success stories in the history of Corporate India. There is no doubt that we are in the midst of a great revolution in the history of women.

But the corporate world does not change rules by gender, therefore today; a woman has to be as tough as a man to prove her metal here! She has to fight preconceived notions that she will compromise on work because of her commitments at home. Or that she will NOT be able to physically manage the job like the way men do it! Rather there are men and sadly even some women who think that a woman is best where she deserves to be i.e. home! Now that's nasty!

By nature women are great at multi-tasking, when at home they can gossip over the phone while watching a TV serial! They can run through their child's studies while setting up the washing machine! They can cook as well as instruct the house helpers about their daily chores! In short while men at home boast about being uni-functional devices, which they so proudly claim if asked to contribute in household chores, women seem to be the best bet in the corporate world, if they have the right opportunity to prove their talent and use this same multi-tasking ability at work. And with time women have successfully found their foothold in the corporate world, and climbed to the topmost rung of the corporate ladder, far above the glass ceiling, shattering it to smithereens. From Shehnaz Hussain & Indira Nooyi, to Chanda Kochar women have proved that they are here to widen their own horizons and enrich the corporate world with what they have to offer. Like them, many women today have understood their scope and identified their area of expertise in whichever field they opt. Today, a woman does not mind doing that extra struggle juggling between her home and work, if at the end of the day she has mental satisfaction through work and peace through her home. She is independent and there for a cause! She has a point of view in the decisions both at work and at home, and she loves her struggle and her "no time for nonsense" status as her focus is well defined. Every such woman in my eyes is a woman of substance. She knows what she wants and also knows how far she can go to achieve it and then relentlessly works towards her goals!

International Women's Day (8 March) is a global day celebrating the economic, political and social achievements of women: past, present and future. While I believe that we co-exist with men and do not need such days to celebrate US, I also feel that such days give us a reason to look within ourselves and appreciate ourselves for what we are. May be the men think it is not fair to have a special day for us, and we don't have such MEN's days to celebrate them! But for all you men out there, on this very occasion of the upcoming women's day go ahead and wish at least two women who you think are "women of substance" giving them reasons why you feel so, and you shall be made to feel SPECIAL for the rest of your lives ! This suggestion coming from another woman cannot be futile! Try it and you will realize that women are those special species on this earth that can make your lifetime as special as you like it! If you are still not convinced then let me conclude and remind you of a song written by a MAN dedicated to all WOMEN describing them! And the song goes…..

**She's Always a Woman to Me**

- Billy Joel

Oh--she takes care of herself
She can wait if she wants
She's ahead of her time
Oh--and she never gives out
And she never gives in
She just changes her mind
She is frequently kind
And she's suddenly cruel
She can do as she pleases
She's nobody's fool
And she can't be convicted
She's earned her degree
And the most she will do
Is throw shadows at you
But she's always a woman to me

---

## DETERMINATION

I am alone in the world,
says the whole of my soul.
My body gives no response,
and I have lost my life's goal.
I cry its not fair
But no one cares
I feel theres no scope
and have given up hope
But then I made up my mind
Not to stay behind,
But to follow the great say,
that, `WHERE THERE IS A
WILL, THERE IS A WAY

**-Mrs. Ruchika Rohan Ajinkya**




# 'हस दे तू!'

आज मी दोन गाणी घेणार आहे ती थोडी नर्मविनोदी आहेत. ती घेण्याचे मुख्य कारण म्हणजे त्यात काम करणारी आपली मराठी मंडळी. पूर्वी मद्रासच्या 'ए.व्हीएम.'च्या चित्रपटातून राजा परांजपे, राजा गोसावी, रमेश देव, सीमा देव, काशिनाथ घाणेकर असे अनेक कलाकार चमकायचे. 'भाभी' या चित्रपटातील हे गाणे पाहा. बहीण आपल्या भावाला चिडवत असते. 'फॅशन करण्यात तू पटाईत आहेस पण अभ्यासाच्या नावाने भोपळा'. बेबी नंदा जगदीपला सतावत असते. तिच्या सोबतीला असते छोटी डेझी इराणी.

टाई लगाके.....

टाई लगाके माना बन गये जनाब हिरो

रहे पढाई या लिखाई मे झिरो झिरो.

बेबी नंदा म्हणजे हिंदी चित्रपटसृष्टीची अजरामर 'छोटी बहन.' तिचा अवखळ, सालस अभिनय बघण्यासारखा आहे.

पापड हजार बेलो, कोईभी चाल खेलो

थोडी कहीसे पर अकल उधार लेलो

चष्मा चढाके...(इकडे गॉगल लावलेली डेझी इराणी टेबलाखालून डोकावते)

चष्मा चढाके माना बन गये जनाब हिरो

रहे पढाई या

जगदीप अभ्यासाचे नाटक करत असतो. पुस्तक वाचता वाचता टेबलावरची रसगुल्ल्याची बरणी उचलतो. रसगुल्ले खाऊ लागतो.

करते हो पेट पुजा आये ना पाठ दुजा

इसिलिये तो भेजा रहता है सूजा सूजा

रसगुल्ले खाके...(नंदा बरणीतून रसगुल्ला काढून डेझीकडे फेकते-स्लो मोशन- रसगुल्ला बरोबर तिच्या तोंडात जातो)

रसगुल्ले खाके माना बन गये जनाब हिरो

रहे पढाई या

भाभी-१९५७

संगीत-चित्रगुप्त

गीतकार-राजेंद्र किशन

पार्श्वगायन-लता मंगेशकर

कलाकार-बलराज सहानी, दुर्गा खोटे, जगदीप, नंदा, पंढरीबाई, राजा गोसावी.

भाभी चित्रपटातील हे दुसरं गीत तेवढंच नटखट आणि मजेशीर आहे. महमद रफीच्या आवाजातील हे गीत पडद्यावर साकारलं आहे, आपल्या विनोदाच्या बादशहाने. 'राजा गोसावी' याने.

जवान हो या बुढीया. या नन्हीसी गुडीया

कुछ भी हो औरत जहर की पुडीया

एक समीप दृष्य. पडद्यावर एक नाचणारी बाहुली दिसते. हळूहळू कॅमेरा मागे सरकतो. राजा गोसावी हातावर एक बाहुली नाचवत असतो. मेडिकल हॉस्टेलवर सर्व मित्रमंडळी मौजमस्ती करताहेत आणि गाण्याला सुरुवात होते. रंबासंबाच्या ठेक्यावर सर्वजण नाच करत असतात.

मारे ना पिस्तोलसे या काटे तलवारसे

मर्दको गुलाम बनाये बडे प्यारसे

कभी इकरारसे, कभी इनकारसे,

कजरेकी धारसे या बालोंके सिंगारसे

इसलिये कहता हूं के डरो डरो नारसे, डरो डरो नारसे

स्त्री जात केवढी महाभयंकर आहे.उलटच्या काळजाची आहे हे आपल्या मित्रांना समजावून देण्याचा आटापिटा राजा गोसावी करत असतो.

हो नही सकता काम ए भगवानका

होगा ए नुस्का जरूर सैतानका

चार बुंदे नखरा, आठ बुंदे झगडा

झूठ बारा बुंदे तो सोला बुंदे लफडा

वा:-वा:-वा:-वा: कैसै बनाया तुमने रगडा

स्त्रीची उत्पत्ती कशी झाली. त्यातली घटकद्रव्ये काय होती याचं एक प्रात्यक्षिकच आपल्याला पाहायला मिळतं. प्रयोगशाळेचं साहित्य आहे. एका काचपत्रात आपला नायक चार थेंब नखऱ्याचे टाकतो. आठ चमचे भांडण. बारा थेंब खोटारडेपणा आणि सोळा चमचे लफडी, कुलंगडी. त्या काचपात्रात धुराचा एक मोठा लोळ तयार होतो आणि तो विरल्यावर आत स्त्रीची मूर्ती पाहायला मिळते. हाच तो सगळा रगडा.

जवान हो या बुढीया.

**–नंदकुमार विजयकर**

nandusuhas03@gmail.com

---

## प्रतिक्रिया

प्रभुतरुण दिवाळी अंक २०१० हाती पडला. वाचून संतोष झाला. बहुतांशी आवडला. काही गोष्टी नाही आवडल्या.

आवडलेले लेख- डॉ. सुमन नवलकर यांचा 'पेव्हर ब्लॉक्स' झोपडपट्टीतील लोकांचे जीवन, त्यांची मानसिकता अत्यंत संवेदनशीलरित्या चित्रीत झाली आहे. 'अगडबम्'- विनोदाच्या प्रांतातील सुहासिनीबाईंची हा छानशी मुशाफिरी पाहून एक सुखद धक्का बसला. मोना विजयकर यांचा `We are But Closet Indians' हा लेख आवडला. बालविभाग-ईशान-उत्तम हस्ताक्षर, बिनधास्त फोटो. सानिया सुंदर फोटो त्याहून सुंदर रेखाचित्रे, सानवि-सुंदर लिवाण, हसरा चेहरा. प्रदिप कोठारे यांची व्यंगचित्रे गुदगुल्या करून गेली. मुखपृष्ठ-युवामंचच्या कारकिर्दीचा आढावा उत्तमरित्या प्रतित झाला आहे. कविता-दिवसाचा पक्षी-उज्ज्वला ब्रह्मांडकर उल्लेखनीय.

न आवडलेल्या काही गोष्टी- मुखपृष्ठ एखाद्या स्मरणिकेला शोभेल अशा चित्राची निवड दिवाळी अंकाच्या मुखपृष्ठासाठी करणे अप्रस्तुत. दिवाळी- प्रकाशाचा उत्सव, रांगोळी, रंगांची उधळण, फटाक्यांची आतषबाजी, फराळांची रेलचेल हा सर्व माहोल मुखपृष्ठातून अपेक्षित आहे. दुसरी गोष्ट म्हणजे प्रभुतरुणचे ब्रीद वाक्य- 'तत्त्वाचा बंदा जीव, मूर्तीला कोण विचारी' जे गेले काही वर्षेरोमनाईज्ड मराठीतून लिहिलं जातं तेही चुकीच्या पद्धतीने `Tatwa cha' ऐवजी `Tatwacha' असायला हवं. `Bandha' ऐवजी `Banda' असायला हवं. राहता राहिला मराठीच्या अस्तित्वाचा प्रश्न जो ३० टक्क्यावर आला आहे. एकूण अंक वाचनीय आहे. प्रेक्षणीय आहे. सर्व लेखक, कवी, चित्रकार यांचे अभिनंदन.

**–नंदकुमार विजयकर**

( चुकांची नोंद घेतली. सुधारल्या जातील. **–संपादक**)

●

***खाऊगिरी***

## शिंगड्या

**–सौ. अनुपमा सुरेश कोठारे**

### सोयच्या व दुधी हलव्याच्या

**साहित्य**: १ टिपरी बारीक रवा, १ टिपरी मैदा, १ टिपरी तांदुळाचे पीठ- साठ्यासाठी (तांदूळ रात्रभर पाण्यात भिजवून, सकाळी सुकवून मग दळावे), मीठ चवीपुरते, ३ टेबलस्पून तेल मोहनासाठी, १ वाटी तूप साठ्यासाठी

**पुरण**: दोन मोठ्या नारळांची सोय किंवा दोन किलो दुधीचा हलवा

**कृती**: मोठ्या परातीत रवा व मैदा एकत्र करून मीठ व मोहन घालून नीट मळून घ्यावे.

आता साठा बनविण्यासाठी तूप चांगले फेसून त्यात थोडे थोडे तांदुळाचे पीठ टाकत, मथून घ्यावे. (साठा नीट झाला आहे किंवा कसे हे पाहाण्यास थोडे मथलेले पीठ पाण्यात टाकावे. ते जर तरंगले तर साठा तयार आहे असे समजावे.) तयार झालेल्या साठ्याचे सारखे गोळे करून पाण्यात ठेवावे. (१ टिपरीचे सहा गोळे होतात.) आता पूर्वी मळून घेतलेले (रवा व मैदा) पीठ पुन्हा एकदा मळावे व त्याचेसुद्धा सहा गोळे करावे.

पुढे तीन गोळे घेऊन त्याच्या तीन चपात्या लाटून घ्याव्या (१० इंच व्यासाच्या साधारण).

एक चपाती घेऊन त्यावर पातळ केलेले तूप लावून घ्यावे व त्यावर साठ्याचा एक गोळा सारखा पसरून घ्यावा. नंतर त्यावर दुसरी चपाती ठेवावी व पुन्हा तूप लावून साठ्याचा गोळा पसरून घ्यावा. आता तिसरी चपाती त्यावर ठेवून, तूप लावून तिसरा साठा पसरावा. पुढे त्याची गोल वळकटी करावी. नंतर थोडे तांदुळाचे पीठ घेऊन ती वळकटी गोल गोल फिरवून हाताने लांबच लांब करावी (साधारण एक इंच व्यासाची). तद्नंतर त्या लोळीचे अर्धा इंच जाडीचे गोळे कापून ते एक एक करून लांब गोलाकार लाटून त्यात पुरण भरावे. थोडे पाणी लावून ते बंद करून कातण्याने कापून घ्यावे.

ओव्हनच्या ट्रेमध्ये मावतील एवढ्या शिंगड्या झाल्यावर प्रीहिट करून २०० डिग्री सेंटीग्रेडवर १५ ते २० मिनिटे (गुलाबी होईपर्यंत) ओव्हनमध्ये

(पान ५ कॉ. ४ वर)

**हसरी रेखा** **-प्रदीप कोठारे**



YUVA MANCH
Together Towards Tomorrow

## Coloring dreams with a BRUSH

**-Anuja Ajinkya**

My papa wants me to be a Doctor!!

My dad wants me to get a degree in Business Management!!

My father has asked me to prepare for IIT JEE!!

Everyone in my family is a CA and that's why I will also have to be one!!

This is what I heard most of my classmates say during the last days of school. But I was one of the few fortunate ones whose parents didn't decide a career path for me based on THEIR dreams, THEIR awareness and THEIR expectation. Instead what my papa always told me was," You and Your brother are my only two assets and I would want my assets to grow as much as possible for which I will always be ready to do whatever I can."And that gave me all the liberty to understand my potential, recognize my interests and convert it into a profession. A profession that is not commonly heard of, a profession that requires me to do what I always liked to do, a profession that brought to me to the level at which I am today!!

I have always been the one in the family who even as a child made sure that everyone in the family looked just perfect before leaving the house. I always suggested my brother's clothes, checked and styled my mothers' hair and taught my father to apply perfume the right way. Friends and family came to me with all sorts of beauty related queries and without even a second thought I always had a solution for each one. As a 17 year old I knew that I was good with grooming and believed that all well groomed girls became air hostesses. But my parents told me the right thing- to at least be a graduate before I started working and we all got together to find out graduation stream that would help me become a cabin crew. And eventually I went on to study Bachelors in Hospitality and Hotel Administration for 3 years.


Those 3 years helped me get better with my grooming skills and got me much closer to realizing my aim. As a part of the curriculum we had a lot of grooming sessions by experts from all over the industry including Makeup Skills, Speech, Interview skills etc and during these trainings I found myself interacting the most with the instructor and grasping each and every topic almost instantly. In the hostel before every campus interview girls came to my room to get final touches on their makeup and the night before to get quick fix tips for their last minute nasty zits. By the time I came out from the course I knew exactly where I was headed.

It took very little convincing for my parents to allow me to come alone to Mumbai to study makeup, grooming and hairstyling from Christine Valmy International School of Esthetics and Beauty. And once that started there was no looking back. Being one of their good students I was chosen to assist the trainers for almost all the Corporate Grooming training sessions ( Airlines, Banks, Retail Chains) and Events ( Fashion Shows and shoots). At the age of 21 I got my first job as the Makeup and Grooming Trainer for Lakme Training Academy where I evolved as a trainer with a hoard of assignments coming up each day for me. For 2years I taught makeup to aspiring makeup artists, practitioners working at the salons, individuals willing to improve their skills on self makeup and a lot more makeup. I trained both male and female staff of various star category hotels, airlines, retails chains, banks etc to improve their presentability. I held workshops for college students from various backgrounds to prepare them for their first job interviews and work etiquette. I did personality development trainings for the underprivileged from various NGOs and the more privileged ones from all walks of life. At an internal level I also trained the retail staff of the brand at various levels about the products, brand, selling skills, etiquette on counter and grooming.

Soon I got hired as the National Trainer, India for Makeup Forever (a luxury makeup brand from France) and Givenchy (a designer brand from France). Within a few months of working for the two brands I was given an expansion in my profile with the addition of trainings for Coty prestige brands i.e., Calvin Klein, Davidoff, Marc Jacobs, Kenneth Cole, Chloe, Vera Wang etc. Work was a much bigger responsibility now having to take care of the training needs of the staff of so many brands across the country. My job was to monitor the staff's performance, identify training needs, plan and design training modules as per the need, conduct the trainings all over the country and apart from that maintain a one to one rapport with each and every beauty advisor which required me to play the psychologist most of the time. All this internal work was in full swing when Makeup Forever was proposed to be the official Makeup Partner for Femina Miss India 2009. With the tie up came to me the role of The Official Makeup Expert for the event. Incidentally I was only 23 years old at that time and that made me the youngest expert on the panel in the history of the event. I trained the 20 finalists on basic makeup skills and supervised their looks for various photo shoots during the event. I worked with the brand for a year more during which along with training I did a lot of writing and shoots for the press which required me to create looks according to seasons, provide tips as a makeup guru, or just write about the products for some esteemed fashion magazines in the country. Career has been very good so far, today I work as an Image and Etiquette Consultant, Makeup and Grooming Expert for corporate and other institutions.

In these 5 years I have evolved

(Cont. on page 5 Col 3)




## BECOMING A MARKET RESEARCHER

**- Vishal Kothare**

(cont..from last issue)

A key part of a researcher's job is selecting the most suitable technique to gain the required information. This could range from telephone interviews, to one-on-one chats, to group discussions contacting people via the internet.

As a general rule, you can expect to be a Research Executive for 12-18 months, after which time you will become a Senior Research Executive.

From then on, most companies base promotion on merit, and you can ascend as fast as the quality of your work and opportunities permit.

Market research can be a very competitive marketplace and having knowledge of the latest research techniques can make the difference between winning and losing a client.

Market research can be a very competitive marketplace and having knowledge of the latest research techniques can make the difference between winning and losing a client.

As a market researcher you'll be expected to be on the ball with what's happening in the industry – you may as well make a start now!

***About the Author***

*Vishal Kothare has been in the market research industry for more than 13 years and is currently employed with IMRB International, India's premier market research company.*

*As a Group Business Director, his role at IMRB International includes achieving business growth and managing business financials, identifying new business initiatives and leveraging skills across units, and building and nurturing strong client relationships. He is also responsible for creating an environment that fosters innovations, driving thought leadership and developing research capability among team members.*

## अनोळखी ओळख की ओळखीचा अनोळखी

**-उज्ज्वला ब्रह्मांडकर**

परवा सकाळी ऑफिसला जाण्याच्या वेळेला बाहेर पडले... फूटपाथवरून खाली उतरून रस्ता ओलांडल्यानंतर लगेचच ती समोरून आली. तश्शाच नेहमीच्या लगबगीने. मी तिचे आज नीट निरीक्षण केले. पंजाबी ड्रेस, कानात मोठ्या रिंग्ज, खांद्यावर चॉकलेटी रंगाची पर्स, कुरळे केस मागे पिननं बांधलेले, केसात टपोरं लाल गुलाबाचं फूल, तिच्या गोऱ्यापान रंगाला तो लाल ड्रेस नी त्यावरचं ते मॅचिंग फूल खूप शोभून दिसत होते. आमची दोघांची नजरानजर झाली. दोघींच्याही चेहऱ्यावर मंद स्मित तरळलं. ती भराभर चालत होती. मी मात्र व्हीआरएस घेतल्यानं आरामात चालत होते. तिच्या नजरेत माझ्या हळू चालण्याबद्दल आश्चर्य डोकावलं. रोज ती दिसल्यावर मला हायसं वाटायचं. ती दिसली म्हणजे अजून साडेआठ वाजलेले नाहीत हे समजून यायचं. कदाचित तीसुद्धा माझ्या दिसण्यावर घड्याळाचा अंदाज बांधत असेल. काय असेल तिचं नाव? कुठे राहात असेल? घरी कोण कोण असेल? काहीही माहीत नाही. तिची ओळख गोरी, कुरळे केसवाली एवढीच. थोडं पुढे गेल्यावर एक मध्यमवयीन बाई दिसायची. तिची रोज एकच साडी बघून सुरुवातीला आश्चर्य वाटलं. नंतर कळलं की इंडियन ऑईलमध्ये काम करते ती. तो तिचा युनिफॉर्म आहे. तेव्हापासून इंडियन ऑईलवाली ही तिची ओळख झाली.

असे कितीतरी अनोळखी पण ओळखीचे चेहरे खूपदा दिसतात. संध्याकाळी गॅलरीत उभे राहिले की एक काठी घेतलेले सडपातळ वृद्ध काका जातात. कधी मुलीला शाळेतून घरी नेणारी एका गुबगुबीत गालाच्या गोंडस मुलाची आई नी तो मुलगा रस्त्यातून रमत गमत जाताना दिसतात. तरी कधी रोज केसात गजरा माळून जाणारी तिशीतली तरुणी दिसते. कधी भगिनी समाजातल्या कार्यकर्त्यांचा ग्रुप किंवा तिकडचा कार्यक्रम संपल्यावर सभासद भगिनींचा ग्रुप थबकत थबकत गप्पा मारत जाताना आढळतो. बसमध्ये तर असे कितीतरी.. शाळा, कॉलेजात जाणारी ठराविक मुले, अधल्यामधल्या स्टॉपवर उतरणारे वेगवेगळ्या ऑफीसमधले लोक, बायका इ. एवढंच नव्हे तर कोपऱ्यावरची गजरेवाली, म्हातारा पेरु, चिकू, केळी विकणारा...ह्या सगळ्यांची नावं माहीत नाहीत, कुठे राहतात ते माहीत नाही. कुठं जातात ते ठाऊक नाही..नी तरीही हे सगळे ओळखीचे वाटतात. रोज हे लोक दिसले नाहीत तर चुकल्याचुकल्यासारखं वाटतं, परवा दिसलेली कुरळे केसवाली कधी दिसली नाही तर आपल्याला उशीर झालाच की काय ह्या शंकेने जीव वरखाली व्हायचा. पुन्हा पुन्हा घड्याळ बघत, घड्याळ मागे तर नाही ह्या शंकेवर हेलकावे खात स्टॉपवरची मध्यमवयीन जरा स्थूल बाई दिसेपर्यंत मला कासावीस वाटायचं. जणु हे सगळे रस्त्यावरचे मैलांचे ओळखीचे टप्पे. पूर्ण अनोळखी तरीही मनाचा कोपरा ठामपणे व्यापणारे. मग वाटते नावात काय आहे? ज्यांची नावं गावं घरं पत्ते माहीत आहेत, त्यांच्याविषयी अशी काय विशेष माहिती असते आपल्याला? ह्या अनोळखी माणसांएवढेच ओळखीच्यांचे स्वभावही खऱ्या अर्थानं माहीतच नसतात. तरीही आपण नाव ऐकलं की म्हणतो-'हो हो! आमची चांगली ओळख आहे त्यांच्याशी?' किंवा 'त्यांना चांगले ओळखतो आम्ही.'

तर मग ओळख म्हणजे नेमकं काय? फक्त नाव, पत्ता, थोडंसं संभाषण, काही घडलेल्या घटना, त्यांच्याबरोबर घालवलेले काही क्षण एवढंच?

हे अशा ओळखीचे लोक अनोळखी व्हायलाही वेळ लागत नाही. एखादा उगीचच आपल्याशी वाईट वागतो. तेव्हा तो समोरून आला तरीही आपण त्याला ओळख दाखवत नाही. कुणी स्वत:च्या स्वार्थासाठी आपल्याला त्रास दिला तर पुन्हा तो भेटेल तेव्हा त्याच्याशी बोलणंही नको वाटतं. त्याचं नाव, गाव, पत्ता सर्व विसरावंसं वाटतं. आणि बघता बघता असे ओळखीचे चेहरे अनोळखी होऊन जातात आणि त्यांच्यापेक्षा रोज भेटणारी अनोळखी पण ओळखीच्या चेहऱ्याची माणसं उगीचच आपली वाटतात. कधीतरी ती कुरळे केसवाली थांबेल, बोलेल. ते बोलणं जुजबीच असेल.

पणते बोलणंच खूपदा चांगलं वाटतं. थोडावेळ टाईमपास. ओळखीच्या माणसांबरोबर बोलणं म्हणजे उगीचच समोरच्याच्या मनाचा बहुधा नेहमीच चुकणारा अंदाज बांधणं, कधी त्यांच्या स्तुतीनं खूष होणं नी कधी त्यांच्या बोलण्यानं नाराज होणं. काय तो मान अपमान त्याच्या मर्जीनुसार किंवा आपल्या व्यक्तिमत्त्वानुसार. तसंही बोलणं जुजबीच. 'काय? कसं काय? तुमच्याकडे सगळे ठीक आहेत ना? आमच्याकडेसुद्धा ठीक आहे.' किंवा बदलतं हवामान, कुठच्या तरी ओळखाच्या निंदा...नकोच वाटतं हे सगळं...नी मग ते ओळखीचे चेहरे पूर्ण अनोळखी वाटायला लागतात. कधीतरी अशा माणसांकडून आपल्याला धोका दिला जातो नी वाटतं, अरे! असं कसं आपण ह्या माणसाला ओळखलंच नाही.

●

## पाठारे प्रभु महिला समाज

रविवार दिनांक ९ जानेवारी २०११ रोजी पाठारे प्रभु महिला समाजातर्फे आनंद मेळावा पाठारे प्रभु को-ऑप. सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्राच्या सभागृहात १२वा रस्ता, खार (प.) येथे आयोजित केला होता. या मेळाव्याचे उद्घाटन प्रमुख अतिथी सुप्रसिद्ध हिंदी सिने अभिनेत्री ग्रेसी सिंग यांच्या हस्ते झाले.

पाहुण्यांना समाजाच्या अध्यक्षा सौ. वृंदा जयकर यांनी भेटवस्तू देऊन सन्मानित केले. उत्तरादाखल ग्रेसी सिंग ह्यांनी समाजाचे आभार मानले. यावर्षी समाजाने सर्वोत्कृष्ट स्टॉलचे बक्षिस ठेवले होते. सर्वोत्कृष्ट स्टॉलचे बक्षिस ग्रेसी सिंगच्या हस्ते वेगवेगळ्या डिजाईन्सच्या पर्सेस असलेल्या सौ. स्वीटी मानकर ह्यांना देण्यात आले. एकंदर ५६ स्टॉल विविध पद्धतीने सजविलेले होते.

स्टॉल पाहाण्यासाठी लोकांनी गर्दी करून आणि खरेदी करून व धुंद म्युझिकच्या वातावरणात खाण्याचा आस्वाद घेऊन आनंद मेळाव्याचा आनंद लुटला.

रविवार दिनांक ३० जानेवारी रोजी पाठारे प्रभु महिला समाजाने 'प्रीती भोजनाचा' कार्यक्रम आयोजित केला होता.

समाजाध्यक्षा सौ. वृंदा जयकर ह्यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात सांगितले की समाजाच्या वयोवृद्ध महिला सभासद सहलीला येऊ शकत नसल्यामुळे आम्ही हा नवीन उपक्रम करण्याचे ठरविले. ह्या उपक्रमाला आपल्याकडून प्रतिसाद मिळाल्यामुळे धन्यवाद.

लहानथोर सर्व भगिनी उत्साहाने प्रीतीभोजनात सामील झाल्या होत्या. भगिनींनी गमतीदार किस्से, उखाणे घेऊन कार्यक्रमात मजा आणली. सौ. रॉनिका विजयकरांनी गाणे गाऊन मनोरंजन केले.

बास्केट बॉल, स्ट्रॅाने वाटाणे उचलणे, हौजी गेम ह्यासारखे खेळ भगिनी उत्साहाने खेळल्या. समाजाने खेळांसाठी बक्षिसे ठेवली होती.

सर्व भगिनींनी मौजमजा करून व रामनाथ कॅटरर्सचे सुग्रास जेवण जेवून 'प्रीती भोजनाचा' आस्वाद घेतला.

रविवार दिनांक २० फेब्रुवारी २०११ रोजी पाठारे प्रभु महिला समाजाचा ९६वा वार्षिक बक्षिस समारंभ याच सभागृहात दुपारी ४वाजता डॉ. सौ. मोना सिंग यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात येणार आहे.

या समारंभाला अवश्य उपस्थित राहण्याचे आवाहन पाठारे प्रभु महिला समाजाच्यावतीने करण्यात आले आहे.

**मराठी नाट्यसृष्टीत आपल्या नेपथ्याचा इतिहास निर्माण करणारे कलावंत श्री. पांडुरंग कोठारे यांना आमची भावपूर्ण श्रद्धांजली**

(Cont. from page 4 Col 4)

as an individual with an improved set of skills, learnt from my experiences, had my own share of challenges followed by highs and lows. I am still in the process of learning and growing, but one thing that will remain constant in my leanings from life is-

**To find a career to which you are adapted by nature, and then to work hard at it, is a near perfect formula for success and happiness. One of the fortunate aspects of this formula is that, granted the right career has been found, the hard work takes care of itself. Then hard work is not hard work at all.**

(पान ३ कॉलम ४वरून)

भाजून घ्याव्या.

राहिलेल्या वरीलप्रमाणे कृती करून शिंगड्या बनवून घ्याव्या. अशा प्रकारे आपल्याला सत्तरएक खुसखुशीत शिंगड्या खावयास मिळतात. खुसखुशीतपणा चांगला साठा व पीठ मळण्यावर अवलंबून असतो.

आता आपण पुरण कसे करावयाचे ते पाहूया.

### पुरण सोयचे

**साहित्य:** नारळाची सोय, साखर (एका मोठ्या नारळास सपाट टिपरी.) वेलची व जायफळ याची पावडर, बदाम, पिस्ता बारीक केलेला, खिसमिस.

**कृती:** सोयमध्ये साखर थोडावेळ घालून ठेवावी. नंतर चुलीवर ठेवून घाटावी. साधारण सुकी झाली की उतरावी. थंड झाल्यावर त्यात वेलची, जायफळ, बदाम, पिस्ता व खिसमिस घालून नीट मिक्स करावे.

### पुरण दुधी हलव्याचे

**साहित्य:** दुधी, साखर (१ किलो दुधीस सपाट टिपरी), इसेन्स, वेलची व जायफळ यांची पावडर, चवीपुरते मीठ व खसखस.

**कृती:** दुधी सालासकट कापून खिचणीवर खिचावा. नंतर थोडावेळ त्याला शिजवून त्यात खसखस सोडून वरील पदार्थ घालून सुका होईतो चुलीवर ठेवावा. थंड झाल्यावर त्यात खसखस घालावी.

●

## प्रभुतरुणास देणगी

❖ डॉ. चंद्रदत्त भोलानाथ नवलकर यांजकडून वडील कै. डॉ. भोलानाथ सुंदरराव नवलकर आणि आई कै. डॉ. प्रकाशिनी भोलानाथ नवलकर यांच्या स्मृत्यर्थ रु. १००१/-

❖ सौ. मेधा जतेंद्र वाझकरकडून आई कै. श्रीम. ललिता पृथ्वीराज जयकर यांच्या स्मृत्यर्थ रु. १००१/-

❖ सौ. हर्षा व श्री. रसिक गणपतराव जयकर (दादर) कडून नातू झाल्याबद्दल रु. २५१/-

❖ सौ. प्रतिमा आणि श्री. विनोद प्रधान यांजकडून त्यांचा नातू श्री. आतीश अलोक प्रधान याच्या उज्ज्वल यशाप्रीत्यर्थ रु. १५१/-

●

## पाठारे प्रभु सोशल समाज दीपावली संमेलन

शनिवार दि. २७-११-१० रोजी साहित्य संघात समाजाचे संमेलन पार पडले. प्रमुख पाहुणे होते नेपथ्यकार श्री. पांडुरंग कोठारे. आरंभ समाजाध्यक्षा सौ. प्रमिला तळपदे यांच्या प्रास्ताविकाने झाला. सौ. सुशीला आणि श्री. पांडुरंग कोठारे यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. श्री. पांडरंग कोठारे यांनी आठवणींना उजाळा देत समाजकार्याला शुभेच्छा दिल्या. बालकांपासून वृद्धांपर्यंत उत्साही कलाकारांनी आपली कला पेश करत हे संमेलन यशस्वी केले. वीरधवल तळपदे, सौ. मयुरा नायक, सौ. श्रेया तळपदे यांनी अप्रतिम नृत्ये बसविली होती. सौ. पूजा अजिक्य लिखीत आणि दिग्दर्शित 'फोर इडियटस्' ही एकांकिका, श्री. केदार गोरक्षकरांचा वाद्यमेळ आणि गाणी यांनी हा कार्यक्रम रंगतदार आणि सोशल झाला. तनिषा देसाई, युग कोठारे, नील राणे, यश तळपदे, रिद्धी तळपदे, भारती विजयकर, पन्ना कोठारे, नीलन धैर्यवान, अनिला धैर्यवान, दिशा कोठारे, दर्शना जयकर, सुश्मिता कोठारे, कश्मिरा अजिक्य, संजना कोठारे, मिथिल नवलकर, निहाल कीर्तिकर आदी पन्नास कलाकारांचा सहभाग होता, उपाध्यक्षा श्रीमती स्वाती राणे यांनी पती प्रवीण राणे यांच्या स्मृत्यर्थ सर्व कलाकारांना भेटवस्तू दिल्या. त्यांचे वितरण श्री. पांडुरंग कोठारे आणि त्यांच्या पत्नी सौ. सुशीला यांच्या हस्ते झाले.

●

## परीक्षेतील सुयश

IGCSE CIE, केंब्रीज युनिव्हर्सिटी

श्री. आतीश अलोक प्रधान, ९४टक्के

**पीएच्डी (यु.एस.ए.)**

श्री. चंद्रदत्त भोलानाथ सुंदरराव नवलकर

## अभिनंदन

❖ डॉ. चंद्रदत्त भोलानाथ नवलकर



यांनी अमेरिकेतील कॉरलिन्स विद्यापीठातून एक्स्प्लोझिव इंजिनियरिंगमध्ये डॉक्टरेट मिळवली. ते आपल्या ज्ञातीतील एकमात्र 'मायनिंग' एक्स्प्लोझिव इंजिनियर आहेत. मन:पूर्वक अभिनंदन.

❖ महिला विकास मंडळ, कुलाबा या संस्थेच्या वतीने हीरक महोत्सवानिनित्त आयोजित मुंबईतील महिला मंडळाच्या सदस्यांची काव्यलेखन स्पर्धा झाली. परीक्षक उषा मेहता होत्या. या स्पर्धेत खारच्या संस्कृती मंडळाच्या सौ. कल्पना सुभाष कोठारे यांच्या 'तुज' कवितेस चौथ्या क्रमांकाचे बक्षिस प्राप्त झाले. अभिनंदन.

❖ सौ. अनिता सुनील कोठारे (प्रा. अनिता राणे) यांनी आगगाडीतील उपद्रवाबद्दल थेट तक्रार करून निधडेपणाने अन्यायाचा प्रतिकार केला. 'टाइम्स'मध्ये त्याची त्यांच्या छायाचित्रासह बातमी झळकली. त्यांच्या 'अन्याय घडो कोठेही पेटून उठू आम्ही' या वृत्तीला अभिवादन आणि त्यांचे अभिनंदन.

●

## सुशोभीकरण

**-दिपक धैर्यवान**

'किमया प्रतिष्ठान' ह्या विलेपार्ले (पूर्व) येथील संस्थेचे कार्यकर्ते सर्वश्री हर्षल अशोक धराधर आणि चैत्रल अशोक धराधर ह्या बंधुंतर्फे कै. कॅ. विनायक गोरे ह्यांच्या स्मारकाचे सुशोभीकरण नगरसेवक श्री. शशिकांत पाटकर ह्यांच्या मार्गदर्शनाखाली व त्यांच्याच नगरसेवक निधीतून करण्यात आले. ह्या निमित्ताने भारताच्या प्रजासत्ताक दिनी म्हणजेच बुधवार, दि. २६ जानेवारी २०११ रोजी एक छोटासा कार्यक्रम कै. कॅ. विनायक गोरे उड्डाण पुलाच्या सुरुवातीला असलेल्या त्यांच्या स्मारकाजवळील जागेत आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला कर्नल सहारन, श्री. शशिकांत पाटकर व श्री. प्रताप वेलकर ह्यांच्यातर्फे स्मारकावर पुष्पचक्रे वाहण्यात आली.

अध्यक्षस्थानी कर्नल सहारन, ग्रुप प्रमुख, राष्ट्रीय छात्रसेना होते.

श्री. प्रताप मोतीराम वेलकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

व्यासपीठावर कर्नल सहारन, श्री. प्रताप वेलकर, श्री. शशिकांत पाटकर, श्री. जोशीगुरुजी आणि श्री. अशोक धराधर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला नगरसेवक श्री. शशिकांत पाटकर ह्यांनी कै. कॅ. विनायक गोरे ह्यांच्या स्मारकाच्या सुशोभीकरणाचे प्रयोजन व कार्य ह्यांची सविस्तर माहिती उपस्थितांना करून दिली. ह्या स्मारकाचे महत्त्व जाणून त्याची योग्य ती निगा राखणे ही आपणा सर्वांचीच जबाबदारी असल्याने ती समर्थपणे पार पाडण्यासाठी आपण सदैव तत्पर असावे अशी विनंती त्यांनी सर्वांना केली.

कर्नल सहारन ह्यांनी कै. कॅ. विनायक गोरे ह्यांच्या राष्ट्रीय छात्रसेनेच्या कारकिर्दीला उजाळा दिला व त्यांच्या कॅप्टन पदापर्यंतच्या प्रगतीचे कौतुक केले.

श्री. प्रताप वेलकर ह्यांनी आपले उद्बोधक विचार मांडले. विनायक गोरेंच्या आईंची प्रशंसा त्यांनी केली. वीरमाता म्हणून कौतुक केले. श्री. हर्षल धराधर ह्यांनी आभार मानले.

सर्वांनी 'आरे एनर्जी' ह्या शीतपेयाचा आस्वाद घेतल्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

**बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुणाच्या मालकीचे हे पत्र** स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ शाह अँड नाहर इंड. इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४०० १०२ येथून प्रसिद्ध केले. **कार्यालय दूरध्वनी** : ६७८ ०० ४४

## प्रभुतरुणाची डायरी

### बाळा जो जो रे

१६-१०-१० पूर्वीची कु. नयना रसिक जयकर (आताची सौ. नयना जोसवा तळकर) पुत्र

### आत्याबाई नाव बोला

११-८-१० असना अभिजीत तळपदे

### नारळ साखर दिला

२१-११-१० श्री. स्वप्नील सुभाषचंद्र कीर्तिकर, कु. करिष्मा मयुर अजिंक्य

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| १६-१२-१० | श्रीमती सुनंदा कृष्णनंदन आगासकर | वय ८२, | वांद्रे |
| ३१-१-११ | श्री. दत्तकुमार बाळाराम नवलकर | वय ८९, | बोरिवली |
| २-२-११ | श्रीमती अनिता विजय गोरक्षकर | वय ७८, | अंधेरी |
| १०-२-११ | श्री. पांडुरंग रघुवीर कोठारे | वय ७८ | मालाड |


// श्री इंद्रायणीप्रसन्न // // श्री गुरुदेव दत्त //

**प्रकास्व कॅटरर्स**

*शुभ मंगल, स्वागत समारंभ...... सहली, सम्मेलन!*

*आम्ही, अशा मंगल प्रसंगी रुचकर जेवणाची व्यवस्था करण्यास सज्ज आहोत. पाठारे प्रभूंच्या वैशिष्ट्यपूर्ण पदार्थांची व्यवस्था, शाकाहारी/मांसाहारी जेवणाचे चवदार गरमागरम खाद्य पदार्थ नियोजित वेळी पोहचविण्याची, वितरण आदी सेवा! विशेषत: सागुपुरी, गोडी बटाटी, अननस सांबारे इ. आणि तसेच पंजाबी डिशेस, गुजराथी डिशेस शिवाय सजावट - रोषणाई फर्निचर आदी व्यवस्था देखील करतो. खारमधील गायत्री मंदिराशेजारील पाठारे प्रभू ज्ञाती सभागृहात एकमेव आम्हालाच मागणी असते.*

संपर्क :

**प्रवीण धुरंधर**

डि. १३, बँक ऑफ इंडिया, वृंदावन सोसायटी, दुसरी कोल डोंगरी लेन,
स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी (पू.) मुंबई-४०० ०६९.
फोन : २६८४ ०९ २६ भ्रमणध्वनी : ९९६९१०४३८८



**स्वामी समर्थ होममेड फूड प्रॉडक्टस्**

होळी रे होळी, गोरक्षकरांची पोळी,
परभांच्या पोटात गोरक्षकरांची पोळी

**जाहिरात वाचून पटकन् फोन करा व आजच आपल्या तेलपोळी व पुरणपोळीची ऑर्डर बुक करा**

*आमचे इतर दर्जेदार व खुसखुशीत पदार्थ*

**बासमती डाएट चिवडा, मस्का शंकरपाळे (गोड), बेक्ड गोड शंकरपाळे, कणिक मैदा चटपटीत रोस्टेड शंकरपाळे, भाजणीची मेथीपुरी, भाजणीची डाएट चकली, लसूण टोस्ट, वरीचे पीठ आणि बटर स्कॉच लाडू व बरेच काही.**

**केदार गोरक्षकर** ९८१९१७६७९९९
**अनघा केदार गोरक्षकर** २२०३२०१०४

वीर विलास, १ला मजला,
४ नवलकर क्रॉस लेन, व्ही. पी रोड,
गिरगाव, मुंबई-४०००० ४